नोंदणी क्र. : जेएएल/आरएसआर/सीआर/४२१/०४

# स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या.जालना.

मुख्य कार्यालय : बी-२/३ उढाण कॉम्प्लेक्स,दत्त मंदिराजवळ,मस्तगड जुना जालना ता.जि. जालना

## 22 वी वार्षिक सर्वसाधारण सभा

(फक्त सभासदांसाठी )

संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अभय लक्ष्मणराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षते खाली शनिवार १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता **"काळुंका माता सभागृह" एस बी आय बँकेच्या बाजुला, गांधी चमन, जुना जालना** येथे खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केली आहे. कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## विषय पत्रिका

१. दि. ०५/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दि ३१/०३/२०२६ अखेरची आर्थिक पत्रके ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वार्षिक अहवालावर विचार करुन मंजूर करणे.

३. २०२४-२५ च्या लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.

४. सन २०२५-२६ चा लेखा परिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.

५. सन २०२६-२७ च्या संस्थेच्या लेखापरिक्षणासाठी सहकाराच्या सुचीवरील (पॅनल) लेखापरिक्षकाच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत व मानधन ठरविणे.

६. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी व लाभांश दर जाहीर करणे.

७. सन २०२६-२७ चे अंदाजपत्रकास मान्यता घेणे व सन २०२५-२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

८. " सुधारित आदर्श उपविधी २०२५ " स्विकारणे बाबत.

९. संस्थेच्या वर्ष २०२६-२७ साठी कर्ज धोरणाला मान्यता देणे.

१०. संचालक मंडळ सदस्य व त्याचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेऊन नोंद घेणे.

११. या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुऊपस्थिती क्षमा पालन करणे संबंधी.

१२. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

दि. २३/०७/२०२६ **मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**

जा.क्र. जेएलएन/२०२६/०७/४२ **व्यवस्थापक**

## सभासदांना विनंती

- गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

- वार्षिक सर्वसाधारण सभेस होणाऱ्या विषयासंबंधी काही सुचना/प्रश्न असल्यास मुख्यालयात दिनांक १०/०८/२०२६ पर्यंत कामकाजाच्य

## आपली संस्था संक्षिप्त आढावा

| | |
|---|---|
| संस्थेचे नांव | : स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जालना |
| नोंदणीकृत पत्ता | : बी२/३ उढाण कॉम्प्लेक्स, दत्त मंदिरजवळ, मस्तगड जालना-४३१२०३. |
| | दुरध्वनी क्रमांक : २३४१७८ , २३६१७८ |
| कार्यक्षेत्र | : जालना जिल्हा |
| शाखा | : १५ शाखा |
| सभासद संख्या | : १४२६१ |
| अधिकृत भाग भांडवल | : १०,००,००,००० |
| वसूल भाग भांडवल | : २,८५,४६,३४१/- |
| राखीव निधी | : ८७,१७,५२१/- |
| स्वनिधी | : ७ कोटी ८७ लाख |
| खेळते भांडवल | : ९५,५७,९४,४४६/- |
| गुंतवणूक | : २२,७५,९२,७३९/- |
| कर्ज बाकी येणे | : ५९,४१,७९,५१९/- |
| एकुण ठेवी | : ८३,८३,००,३२७/- |
| एकुण उत्पन्न | : ९,६४,९६,०२८/- |
| एकूण खर्च | : ८,९९,१४,९३०/- |
| नफा | : ६५,८१,०९८/- |
| बँक कर्ज | : निरंक |
| वर्षात दिलेले कर्ज | : ४३,७६,८२,४८०/- |
| वर्षातील नवीन कर्जखाते | : ३४४३ |
| वर्षातील कर्ज वसुली | : ३१,६२,१७,३६७/- |
| ठेवीदारांची संख्या | : ५२४८ |
| एकूण कर्जदार | : २६३२ |
| थकबाकीचे प्रमाण | : ६.६० % |
| एन.पी.ए.चे प्रमाण | : १.६८ % |
| ऑडीट वर्ग | : अ |
| पॅन नं. | : **AABAS7642G** |
| टॅन नं. | : **NSKS07269D** |

सहकारातून विश्वबंधुत्वाकडे

## २२ वी वार्षिक अहवाल २०२५-२६

**सर्व सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपल्या स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना यांच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक तसेच मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत करीताना मला अत्यंत आनंद होत आहे.

सहकार ही केवळ आर्थिक व्यवहारांची व्यवस्था नसून परस्पर विश्वास, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक प्रगतीचा प्रभावी मार्ग आहे. या उदात्त विचारांना केंद्रस्थानी ठेवून आपल्या संस्थेने स्थापनेपासून सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी सातत्याने कार्य केले आहे. सभासदांचा दृढ विश्वास, संचालक मंडळाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, अधिकारी व कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि ग्राहकांचे अमूल्य सहकार्य या बळावर संस्था आज प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ हे संस्थेच्या दृष्टीने प्रगती, स्थैर्य आणि विश्वास दृढ करणारे वर्ष ठरले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीतही संस्थेने आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदकेंद्री सेवा या मूल्यांचा अवलंब करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ठेवींची वाढ, कर्जवाटपातील गुणवत्ता, नियमित वसुली आणि आर्थिक स्थैर्य यामुळे संस्थेची विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे. डिजिटल युगाची गरज ओळखून संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत QR Code सुविधा, मोबाईल बँकिंग, NEFT/RTGS यांसारख्या सेवांचा प्रभावी विस्तार केला आहे. यामुळे सभासदांना सुरक्षित, जलद आणि सुलभ बँकिंग सेवा उपलब्ध होत असून संस्थेच्या कार्यक्षमतेतही लक्षणीय वाढ झाली आहे. आपली संस्था केवळ आर्थिक सेवा देणारी संस्था नसून सामाजिक उत्तरदायित्व जपणारी सहकारी चळवळीचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. सभासदांचा सर्वांगीण विकास, आर्थिक स्वावलंबन आणि विश्वासार्ह सेवा हेच संस्थेचे प्रमुख ध्येय राहिले असून भविष्यातही त्याच तत्त्वांवर वाटचाल सुरू राहील.

या आर्थिक वर्षातील संस्थेचा कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच इतर वैधानिक बाबी आपणासमोर सादर करताना मला मनस्वी समाधान वाटत आहे. या अहवाल वर्षात संस्थेने ठेवीमध्ये १७% वाढ नोंदवित ठेवींचा आकडा ८३ कोटी ८३ लाख पर्यंत नेऊन मोठा टप्पा गाठला आहे. आगामी काळातही संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नव्या संकल्पना, आधुनिक सुविधा आणि सभासदहिताच्या विविध योजना राबविण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. संस्थेच्या या यशस्वी वाटचालीत मोलाचे योगदान देणारे सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व हितचिंतक यांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे. आपण सर्व ही संस्था आपली स्वतःची समजून जे सहकार्य दिले त्याबद्दल मी सर्वांचे पुन्हा आभार मानतो. आपले प्रेम, विश्वास आणि सहकार्य भविष्यातही असेच

लाभत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करीत संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, हीच सदिच्छा.

❖ **वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मागील वार्षिक सर्वसाधारण सभा ०५/०९/२०२५ रोजी २१ वि वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली होती त्यावेळी १९५ सभासद उपस्थित होते.

❖ **संचालक मंडळ सभा :-**

संस्थेच्या अहवाल काळात एकूण १२ मासिक सभा झाल्या. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. मासीक सभांमध्ये तसेच दैनंदिन कामकाजात सर्व मान्यवर संचालकानी आपुलकीने व उत्साहाने भाग घेतला. व संस्थेचे भागभांडवल, ठेवी वाढविण्यासाठी तसेच थकबाकी वसुलीसाठी कसोशिने प्रयत्न करतात, त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

❖ **भाग भांडवल व सभासद संख्या :-**

संस्थेच्या भाग भांडवलात झालेल्या वाढीची आकडेवारी बोलकी असून सभासद संख्या वाढ अहवाल काळात समाधानकारक आहे.

| सन | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | वाढ | % |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,६०,९१,६००.०० | २,७१,१६,९४१.०० | २,८५,४६,३४१.०० | १४,२९,४०० | ५.२७% |
| सभासद संख्या | ११,२८५ | १२,२२८ | १४,२६१ | २०३३ | १६.३६% |

❖ **ठेवी :-**

संस्थेच्या सर्व सभासद व हितचिंतक ठेवीदारांनी संस्थेवर सातत्याने व उदंड प्रेम व वाढता विश्वास ठेवला आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या ठेवींमध्ये वाढीच प्रमाण चांगले आहे.

| ठेवीचा प्रकार | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ | २०२५-२६ | वाढ/घट | % |
|---|---|---|---|---|---|
| अल्प बचत | २,७५,९५,६१६ | २,७८,९८,१५१ | ३,९१,३५,६५९ | १,१२,३७,५०८ | ४०.२८ |
| बचत खाते | ६,२३,९४,९१० | ८,०७,४४,००९ | ९,९८,७३,४१३ | १,९१,२९,४०४ | २३.६९ |
| चालू खाते व इतर मुदत ठेव | ३,०९,८७,७७२ | ७,६४,२९,२८३ | ५,९५,४९,६११ | -१,६८,७९,६७२ | -२२.०८ |
| अल्पमुदत ठेव | ८,२६,७५,९६० | ६,१६,९७,४४५ | ७,६८,५३,३२४ | १,५१,५५,८७९ | २४.५६ |
| विवेकानंद जयंती | ४,९८,९२,५२३ | ५,५३,३१,२५० | ८,६३,१६,७१५ | ३,०९,८५,४६५ | ५६.९९ |
| परमहंस ठेव | २५,७२,१७,०५८ | २४,०७,५९,९२१ | २९,०८,०८,३४४ | ५,००,४८,४२३ | २०.७८ |
| आवर्ती ठेव | १,७२,७३,०५९ | १,९२,५१,७९५ | २,११,४६,४२३ | १८,९४,६२८ | ९.८४ |
| मासिक व्याज ठेव | १३,०७,८१,९२९ | ११,७५,४३,८३४ | १३,०५,३३,३३६ | १,२९,८९,५०२ | ११.०५ |
| संस्था वर्धापन दिन | ४,१४,२६,९२२ | ३,७१,७९,५२६ | ३,४०,८३,५०१ | -३०,९६,०२५ | -८.३२ |
| **एकूण** | **७०,०२,४५,७५०** | **७१,६८,३५,२१५** | **८३,८३,००,३२७** | **+१२,१४,६५,०२२** | **१६.९४** |

❖ **कर्ज :-**

संस्थेचे विविध उद्देशासाठी कर्ज वाटपाचे धोरण असून त्यानुसार कर्ज वाटप करुन जनमानसात चांगली प्रतिमा तयार केली आहे. एकूण कर्ज वाटप वर्षनिहाय पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | वाढ/घट | % |
|---|---|---|---|---|---|
| रक्कम रु (लाख ) | ४७,६१,६८,५०२ | ४७,६५,५१,२४६ | ५९,४१,७९,५१९ | ११,७६,२८,२७३ | २४.६८ |

❖ **एन.पी. ए (अनुत्पादीत कर्ज):-**

संस्थांना दिलेल्या एन.पी.ए. निर्देशानुसार ६ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कर्ज हप्ते व्याजासह थकीत झाले असल्यास अशी सर्व खाती एन.पी.ए. (अनुत्पादीत कर्ज) म्हणून संबोधली जातात. अशा कर्जावरील येणे व्याज नफयात घेता येत नाही. त्याचप्रमाणे अशा कर्जाच्या रक्कमेवर संशयित व बुडीत रु २,६५,५२,५९३/- इतक्या रकमेची तरतूद अहवाल वर्षा अखेरीस आवश्यक होती. त्यापैकी रु. ३,००,६२,७६९/- तरतूद करण्यात आली आहे.म्हणजेच ३५,१०,१७५/- जास्त तरतूद केलेली आहे. त्यामुळे संस्थेकडील निव्वळ अनुउत्पादीत कर्ज रु. १,००,२०,११३.२२/- असून अशा कर्जाचे प्रमाण केवळ १.६८% इतकेच आहे. अशा कर्जाची वसुली प्राधान्याने करुन घेण्यासाठी व कायदेशीर कारवाई करावी लागणार नाही यासाठी कर्जदार व जामीनदार या दोघांनी संस्थेस सहकार्य करावे असे आवाहन सर्व थकित कर्जदारांना करीत आहोत.

❖ **वसुली :-**

संस्थेकडे नियमित कर्ज हप्ते भरणाऱ्या कर्जदारांचे प्रमाण चांगले आहे. तथापी काही कर्जदार अनियमित हप्ते भरत असतात अशा खातेदारांकडून नाईलाजाने कायदेशीर मार्गाने वसुली करावी लागते या प्रकारात कर्जदारावरही जास्त बोजा पडतो त्याकरीता सर्व कर्जदारांनी नियमित हप्ते भरुन सहकार्य करावे अशी विनंती संचालक मंडळाचे वतीने मी करीत आहे. यावर्षी संस्थेने वसुली धोरण कडकपणे राबविण्याचे ठरविले असून, अशी कार्यवाही करावी लागू नये म्हणून सर्वांनी सहकार्य करावे व आपण जामीनदार म्हणून असलेल्या थकीत कर्जदारांस कर्जाचे हप्ते नियमितपणे भरणेस प्रवृत्त करावे असे आवाहन सर्वांना करीत आहे.

❖ **गुंतवणूक :-**

| तपशील | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ | वाढ/घट | % |
|---|---|---|---|---|---|
| **सह. बँकेकडील ठेवी** | ७,८९,५५,०७९ | ८,८०,४२,२४१ | १०,०२,१६,९५४ | १,२१,७४,७१३ | १३.८२% |
| **फेडरेशन कडील ठेवी** | ३२,००० | ३२,००० | ३२,००० | - | - |
| **शेडयुल्ड बँकेकडील ठेवी** | ९,४९,९४,१२० | ९,५५,४३,००९ | ११,७२,१८,१९९ | २,१६,७५,१९० | २२.६८% |
| **आवर्ती ठेव** | ०० | ०० | ३०,००० | ३०,००० | - |
| **एकूण** | **१७,३९,८१,१९९** | **१८,३६,१७,२५०** | **२१,७४,९७,१५३** | **३,३८,७९,९०३** | **१८.४५%** |
| **वाढीचे प्रमाण** | **१५.२८%** | **५.५३%** | **१८.४५%** | | |

या शिवाय इमारत निधी व राखीव निधीचे स्वतंत्र खाते उघडलेले आहे.

- **इमारत निधी - १०,२८,२०२/-**
- **राखीव निधी - ९०,६७,३८४/-**

❖ **ठेवीवरील व्याज दर :-** आपल्याकडे असणाऱ्या विविध ठेव योजनांस मिळणारे व्याज दर खालील प्रमाणे आहे.

| कालावधी | ठेवि वरील व्याज दर | जेष्ठांकरीता |
|---|---|---|
| **३१ दिवस ते ९० दिवस** | ७% | ७% |
| **९१ दिवस ते १८०दिवस** | ८% | ८% |

| | | |
|---|---|---|
| **१८१ दिवस ते १२ महिने २९ दिवस** | ८% | ८.५०% |
| **१३ महिने पासुन पुढे** | ९% | ९.५०% |
| **३६ महिने** | १०% | १०% |
| **दामदुप्पट योजना** | ९४ महिने | ८९ महिने |

❖ **लेखापरीक्षण :**

संस्थेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सनदी लेखापरीक्षक **एस.पी.के.ए. &असोसिएट छत्रपती संभजीनगर** यांनी पुर्ण केले आहे. संस्थेने सर्व क्षेत्रात योग्य व नियोजनबध्द प्रगती केली असल्यामुळे यावर्षीसुध्दा लेखापरीक्षण वर्ग **अ** देण्यात आला आहे.

❖ **जागा खरेदी :-** संस्थेने संस्थेची नवीन इमारत उभारणीसाठी मागील सर्वसाधारण सभेत परवानगी घेतली आहे. इमारत उभारणीसाठी बांधकाम परवाणा घेतलेला असुन, त्या जागेवरील नविन इमारत बांधणीचे कामकाज या वर्षी चालु करण्याचे ठरविले आहे. संस्थेने गोलापांगरी या ठिकाणी जागा खरेदी केली असुन, दाभाडी या ठिकाणी जागा घेण्याचे अहवाल प्रस्तावित आहे. अजून एक ते दोन शाखेकरिता जागा खरेदीचा प्रस्ताव आला आहे त्यावर या सभेत विचार होईल.

❖ **संस्थेच्या शाखा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्य शाखा | ९ | अंबड शाखा |
| २ | नविन जालना शाखा | १० | चंदनझिरा शाखा |
| ३ | बदनापुर शाखा | ११ | जाफ्राबाद शाखा |
| ४ | राजुर शाखा | १२ | नविन मोंढा शाखा |
| ५ | रामनगर शाखा | १३ | मंठा चौफुली शाखा |
| ६ | गोलापांगरी शाखा | १४ | दाभाडी शाखा |
| ७ | अंबड रोड शाखा | १५ | सेवली शाख |
| ८ | शहागड शाखा | | |

शासन परिपत्रक जा.क्र.सआ.-/पत/आदर्श उपविधी/१८२२/२०२५ दिनांक : २९/०७/२०२५ अन्वये राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठी सधारीत आदर्श उपविधी २०२५ लागु करण्यासंबंधी उपविधी दुरुस्ती.

| अ.क्र. | उपविधी क्रमांक | जुनी शब्दरचना | सुधरित/नविन शब्दरचना | सुधारणा करणे का आवश्यक आहे या बदलची कारणे |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण आदर्श उपविधी | नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे आदर्श उपविधी (२०१३) महाराष्ट्र शासन | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शासन परिपत्रक जा.क्र.सआ५/पत/आदर्श/उपविधी/१८२२/२०२५ अन्वये राज्यातील नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठी सुधारित आदर्श उपविधी (२०२५) स्विकारणे. | शासनाच्या परिपत्रकानुसार राज्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांनी सुधारित आदर्श उपविधी (२०२५) स्वीकारुन त्याची अंमजबजावणी करणे आवश्यक असल्याने. |

९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने २०२३ रोजी उपविधी दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात सहकारातील बदलत्या समीकरणामुळे तसेच वाढत्या व्याप्तीमुळे मा.शासनाने सहकार आयुक्त यांच्या अध्यक्षतेत एक नवीन समिती उपविधीच्या नवीन प्रारुपाकरीता घटित केली होती यात सहकार तज्ञ व्यक्ती तसेच फे.अध्यक्ष काका, यांचा समावेश होता. या समितीच्या निणर्यानुसार नवीन आदर्श उपविधी २०२५ लागु करावी. असे परिपत्रक शासना मार्फत.

## दीपस्तंभ पुरस्काराचे मानकरी

दीपस्तंभ हा गौरव पुरस्कार आपल्या संस्थेला चौथ्यांदा संस्थेला मिळालेला आहे. सन २०१९-२०, २०२१-२२,२०२३-२४, २०२४-२५ या वर्षांसाठी आपल्याला दिपस्तंभ पुरस्कार देवून गौरवण्यात आले आहे. या वर्षीचा पुरस्कार कर्नाटक सहकार मंत्री व कर्नाटक फेडरेशनचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते दि.१२/१०/२०२५ रोजी श्रीक्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर, कर्नाटक येथे भव्यदिव्य सभागृहात संपन्न झाला.

### ❖ सहकार समाज्ञी -

दि.०३ एप्रिल २०२६ रोजी कोल्हापुर येथे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन तर्फे महिला दिना निमित्त आयोजित सहकारी सम्राज्ञी -२०२६ तसेच सक्षम महिला सक्षम सहकार पुरस्कार - २०२६ पुरस्काराचे नामांकन (बेस्ट कॅशियर,बेस्ट, क्लर्क,बेस्ट प्युन) आयोजित कार्यक्रमात संस्थेतील महिला कर्मचारी यांना पहिले पारितोषिक तसेच बेस्ट कॅशियर,बेस्ट क्लर्क,बेस्ट प्युन या स्पर्धेत देखील कर्मचारी महिलांना कोल्हापुर येथील सायबर कॉलेजच्या आनंद भवन या सभागृहात कोल्हापुरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका साहेब कोयटे, गोदावरी अर्बन पतसंस्थेच्या अध्यक्षा राजर्षी ताई पाटील यांच्या हस्ते पुरस्कार देवुन गौरण्यात आले.

### ❖ मान्यवंराच्या भेटी :-

- मा. राज्य स.पत.फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे महासचिव श्री. शांतीलालजी सिंगी कोषाध्यक्ष दादाराव तुपकर कार्याध्यक्ष राजीवदास जाधव फेडरेशनच्या CEO श्रीमती. सुरेखा लंवाडे यांनी संस्थेस भेट देऊन मार्गदर्शन केले तसेच संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या स्वामी विवेकानंद सहकारी उदयमीच्या उपक्रमास भेट देऊन असे प्रकल्प राज्यभर सुरु व्हावे अशी इच्छा व्यक्त केली.
- अंबड चौफुली शाखेत वर्धापन दिनानिमित्त ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्या कार्यक्रमात (सी.ए) **स्वाती धनांवत मॅडम** यांचे मागदर्शन सभासदांस लाभले.
- जिल्हा उपनिबंधक **मा.श्री. परमेशवरजी वरखडे साहेब ,** व **अधिक्षक श्री. शदर तनपुरे साहेब** यांनी संस्थेस भेट दिली.
- महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिपस्तंभ पुरस्कार मेळाव्यात संस्थेने चौथ्यांदा दिपस्तंभ पुरस्कार प्राप्त केला आहे.
- **अंजली ताई पाटील** महा.राज्य पतसंस्थेच्या संचालीका यांची संस्थेत भेट देऊन महिला कर्मचारी यांना मार्गदर्शन.
- विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थेत दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**१) डॉ.संजय जगताप - वात्सल्य हॉस्पीटल**

२) **श्री. गणेश पडूळ - प्रगत शेतकरी**

३) **डॉ. साबळे - प्रयाग हॉस्पीटल**

४) **ॲड. गणेश तौर**

- **मा.श्री. शिरीष कुलकर्णी साहेब** विशेष जिल्हा लेखा परिक्षक यांची संस्थेत भेट.
- **श्री. सतीशजी टोपे -** अध्यक्ष जिल्हा मध्यवर्ती बँक यांची संस्थेस भेट
- **श्री. सचिन वाणी सर -** मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रियदर्शनी बँक यांची संस्थेत वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रमात कर्मचा-यांना शाखांनी करायचे कामकाज व व्यवस्थापकाचा रोल या विषयी मार्गदर्शन.
- समृध्दी सहकारी साखर कारखान्याचे **अध्यक्ष श्री. सतीशजी घाडगे (पाटील)**,महा.फेडरेशन परसेवा चे सहाय्यक निबंधक **श्री.हर्षीतजी तावरे (ऐ आर)** फेडरेशन पुणे यांची संस्थेस भेट.

## सामाजिक उपक्रम

❖ **स्वामी विवेकानंद जयंती**

संस्थेने सामाजिक दायित्वाने दरवर्षीप्रमाणे सन २०२५-२६ या वर्षातही स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टिकोनातुन दि १२ जानेवारी २०२६ ला जालना शहरातील ७५ शाळांच्या २१०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची स्वामी विवेकानंद व विचार या विषयावर परिक्षा घेण्यात आली. तसेच जिल्हा स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन पारीतोषिक काढण्यात आले आणि प्रत्येक शाळेतून प्रथम व द्वितीय क्रमांक काढण्यात आला. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि.०४/०२/२०२६ रोजी आय एम ए हॉल, राजुरी कॉर्नर येथे मा.जिल्हाधिकारी श्रीमती आषिमा मित्तल मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. बक्षिस वितरण कार्यक्रमास विद्यार्थी त्यांचे पालक व शिक्षकांच्या उपस्थीतीत कार्यक्रम पार पाडण्यात आला.

**कर्मचारी वर्ग:-**

संस्थेच्या प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांचा वाटा संचालक मंडळाप्रमाणेच मोलाचा असतो. कर्मचाऱ्यांना सोपविलेली कामे, दिलेली जबाबदारी व उद्दिष्टे योग्यप्रकारे केल्यामुळे व सर्व ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा दिल्यामुळेच संस्था प्रगतीचे शिखर गाठू शकली आहे. संस्थेस अशाच प्रकारचा निष्ठावान कर्मचारी वर्ग व अल्पबचत प्रतिनिधी, आवर्ती ठेव प्रतिनिधी लाभलेले आहेत. याचा संस्थेस सार्थ अभिमान आहे.

❖ **भविष्य निर्वाह निधी आणि मेडीक्लेम :-**

सर्वसमावेशक सामाजिक सुरक्षेच्या विकसित गरजा पारदर्शक, संपर्करहित आणि कागदविरहित पद्धतीने कर्मचारींना भविष्य निर्वाह निधी आणि परिवार सह आरोग्य विमा योजने चे लाभ दिले जाते व तसेच शासना मार्फत कर्मचारी राज्य विमा अंतर्गत दिल्या जाणा-या विम्याचे लाभ देखील कर्मचाऱ्यांना दिला जाते.

तसेच कर्मचा-यांना दिवाळी बोनसचाही लाभ दिला जातो.

❖ **ओपन हाऊस :-**

कर्मचाऱ्यांसाठी एक नवीन उपक्रम ओपन हाऊस सुरु केला आहे ज्या अंतर्गत सर्व कर्मचारी प्रत्येक पर्यायी शनिवारी एकत्र येताता आणि दैनंदिन अनुभव व चांगल्या कामाच्या टिप्सवर चर्चा करतात.

तसेच दोन कर्मचारी सदस्य नवीनतम तंत्रज्ञान आणि बँकिगंमधील नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांवर अपडेट / माहिती शेअर करत.

❖ **अंबड रोड शाखा -अंबड रोड शाखा येथे (ग्राहक मेळावा) -**

आर्थिक साक्षरता व बचतीचे महत्व ग्राहकांपर्यत पोहचवण्याचे कार्य या ग्राहक मेळाव्या च्या माध्यमातुन करण्यात आले. ग्राहकाभिमुख सेवा व आधुनिक सुविधा या साठी संस्था नेहमी तत्पर असुन, आपल्या ग्राहकांच्या हितासाठी नेहमी असे उपक्रम संस्था घेत असते.

## ❖ सभासदांच्या सोईसाठी विविध योजना व सेवा :-

- **सभासदांसाठी विविध आकर्षक ठेव योजना :**

१) **भगिनी निवेदिता ठेव योजना :-** संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सभासदांना १५१ दिवसांसाठी ठेवीवर ८.५०% व्याजदर व जेष्ठ सभासदांना ९.००% व्याजदर देण्यात येते. तसेच हि योजना दि.१२ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीसाठी सभासदांसाठी उपलब्ध असते.

२) **स्वामी विवेकानंद ठेव योजना :-** १२ जानेवारी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त सभासदांना २११ दिवसांसाठी ८.५०% व्याजदर व जेष्ठ सभासदांना ९.००% व्याजदर देण्यात येते. तसेच हि योजना दि.१० जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीसाठी सभासदांसाठी उपलब्ध असते.

या योजनांना सभासदांनी दिलेला प्रतिसाद पाहता या वर्षी देखील या योजनांचा लाभ सभासंदाना मिळावा म्हणुन या वर्षी देखील या योजना उपलब्ध करण्यात येतील.

➢ **QR CODE सुविधा**

सभासदांना अधिक जलद सुरक्षित आणि सुलभ डिजिटल बँकीग सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संस्थेमार्फत QR CODE सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली ज्यामुळे व्यवसायिक सभासदांना अधिक मदत होते.

➢ **NEFT/RTGS**

संस्थेने सभासदांसाठी NEFT/RTGS सुविधा उपलब्ध केलेली आहे.

➢ **SMS सुविधा.**

बँकिंग प्रणालीद्वारे आपली संस्था सभासदांना दैनंदिन व्यवहाराच्या संदर्भात त्यांनी केलेल्या व्यवहाराचा तपशील संदेश द्वारे पाठवितो. हे सायबर फसवणुकीचा सामना करण्यासाठी संस्थांद्वारे वापरलेले नवीनतम साधन

आहे. पांरपारिक पासवर्डवर अवलंबून राहण्याऐवजी, ग्राहकाच्या मोबाईल फोन द्वारे पाठवले जातात, व्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक असते तुलनेने कमी कालावाधीसाठी वैध असतो आणि एकदा वापरल्यानंतर कालबाह्य होतो.

- **MOBILE APP द्वारे डेली कलेक्शन**

अल्प बचत प्रणाली वापरतांना ती अधिकाधिक मजबूत व त्यात स्पष्टता येण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन, ही योजना राबवितांना संस्था मोबाईल ॲप पध्दतीचा अवलंब करते व ज्या वेळेस अल्पबचत प्रतिनिधी मोबाईल द्वारे पैसे जमा करतो, त्या वेळेस सभासदास मोबाईल वर मेसेज जातो, तसेच पतसंसथेत सुध्दा त्याची नोंद होते हा व्यवहार पूर्णपणे  तंत्रज्ञानाचा  वापर करुन, कुठलाही मानवीय हस्तक्षेप न करता होत आहे.

- **MOBILE BANKING**

सभासदांना जलद व सोयीस्कर बँकिग सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेमार्फत मोबाईल बँकींग सुविधा सुरु करण्यात आली. या सुविधेमुळे सभासद मोबाईल ॲप चा वापर करुन खाते शिल्लक, निधी हस्तांतरण या सुविधांचा उपयोग करु शकतात.

- **CRASS प्रणाली**

फेडरेशनच्या पुढकाराने सुरु केलेल्या  CRAAS (क्रास) या प्रणालीचा संस्थेने अगदी सुरुवातीपासून वापर सुरु केला आहे ही प्रणाली अत्यंत उपयुक्त असून विशेष म्हणजे अत्यंत कमी खर्चिक आहे यामुळे सभासदाचा फायदा होत आहे. त्यासोबत संस्थेसाठी योग्य अर्जदाराची निवड करणे सोपे झाले आहे या वर्षात संस्थेने ९०० पेक्षा जास्त कर्जदाराचे CRASS  रिपोर्ट काढले आहे.

- **MINI ATM सुविधा**

भारतातील कोणत्याही बँकेचे डेबिट कार्ड असलेले कोणत्याही ATM चा वापर करुन रोख रक्कम मिळवू शकतात संस्थेद्वारे रोख पैसे काढण्यासाठी सेवा शुल्क आकारले जाऊ शकते. परंतु आम्ही अशा कोणत्याही व्यवहारासाठी शुल्क आकारत नाही.

संस्थेमार्फत जेष्ठ सभासदांना पैसे काढण्यासाठी MINI ATM द्वारे विशेष घरपोच सेवा देण्यात येते व ही सेवा फार उपयोगी ठरलेली आहे.

- **जेष्ठ नागरिक व निवृत्ती वेतन धारकांसाठी सुविधा**

धकाधकीच्या जिवनात आपण पाहतो की ज्येष्ठ नागरिकांना बँकेतून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागते व त्यांच्या कामात दिरंगाई होते असे पाहत असतो ते टाळण्यासाठी संस्थेने ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या बचत खात्यातून सुलभ व सोयीस्कर रित्या खात्यातून पैसे काढण्यासाठी घरपोच सुविधा देण्याचा मोठा निर्णय संस्थेने ज्येष्ठ नागरिकांनसाठी घेतला आहे. त्यानुसार जेष्ठ नागरीकांना घरपोच सुविधा देण्यात येत आहे.

# आभार प्रदर्शन

संस्थेचे कामकाज सुरळीत चालविण्याच्या दृष्टिने संस्थेचे ठेवीदार, कर्जदार, भागधारक व हितचिंतक यांच्या सहकार्यामुळे संस्था प्रगती करु शकली. संस्था या सर्वांची आभारी आहे. संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी प्रामुख्याने ठेवीदार सभासद व नियमीत परतफेड करणारे कर्जदार या दोघांचे सहकार्य आवश्यक असते व असे सहकार्य संस्थेला नेहमीच मिळाले आहे. संस्था वृध्दींगत होण्यासाठी ठेवीदारांनी जे अनमोल सहकार्य दिले त्याबद्दल संस्थेमार्फत त्यांचे आभार मानतो व यापुढे संस्था ठेवीदारांचे विश्वासास पात्र राहिल अशी ग्वाही मी सर्व संचालक मंडळाचे वतीने देत आहे.

मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था जालना, मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था जालना, यांचेकडून वेळोवेळी संस्थेस मिळालेल्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची मनःपुर्वक आभारी आहे.

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. लि जालना, आय सी आय सी आय बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, जनता सह बँक लि जळगाव ,जना स्मॉल फान्यास बँक, एयु स्मॉल फायन्यास बँक, सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप बँक ठाणे जनता सहकारी बँक, इंडसंड बँक, छत्रपती शाहु अर्बन बँक पुर्णवादी नागरी सहकारी बँक, दीनदयाल नागरी सहकारी बँक, जनता सहकारी बँक लि. पुणे कलपना आवाडे जनता बँक लि. इचलकरंजी, या सर्व बँकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल संस्था त्यांचे मनःपुर्वक आभार मानते.

पतसंस्थेच्या बहुसंख्य सभासदांनी घेतलेल्या कर्जाची वेळेवर व नियमित परतफेड करुन संस्थेस वेळोवेळी सहकार्य केले अशा सर्व नियमित कर्जदारांचे संस्था आभार मानते व भविष्यातही असेच सहकार्य सर्व सभासद, खातेदार, ग्राहक व कर्जदार देतील अशी आशा बाळगते.

याशिवाय संस्थेस ज्यांनी सहकार्य दिले, पण अनावधानाने उल्लेख करण्याचे राहून गेलेले असल्यास संस्था अशा सर्वांचेही आभार मानते. संस्थेची यापूढेही उत्तरोत्तर आर्थिक उन्नती होवो व सर्व सभासदांमध्ये बंधुभाव कायम राहुन, सहकार्याची भावना वृध्दींगत होवो, ही सदिच्छा व्यक्त करुन अहवाल पुर्ण करतो.

**धन्यवाद. . !**

**अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ**
**स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जालना.**

## श्रध्दांजली

अहवाल वर्षात राष्ट्रीय व जागतीक किर्तीचे वैज्ञानिक, थोर नेते, संपूर्ण देशाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, कला व साहीत्य क्षेत्रातील दिवंगत झालेल्या थोर व्यक्तींना आणि संस्थेच्या ज्या सभासदांचे निधन झाले आहे अशा सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे. ईश्वर सर्वांचे आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो ही विनम्र प्रार्थना.

**अध्यक्ष उपाध्यक्ष**
**संचालक मंडळ व कर्मचारी वृंद**

## लेखापरिक्षण अहवाल

**( महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (ब) आणि महाराष्ट्र संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)**

मी स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. जालना ता.जि. जालना संस्थेच्या सोबत जोडलेल्या ३१/०३/२०२६ या दिनांकाचा ताळेबंद २०२५-२६ या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक तपासले असुन अहवाल सादर करतो की,

१. माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे/ माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे मला जी माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२. माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाश्याच्या आधारे.
अ) ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकानिशी जुळले असुन सदर ३१ मार्च २०२६ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची कामकाजाची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितो आणि नफा तोटा पत्रकाचे या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफयाची तोटयांची सत्य स्थिती दर्शवितो.

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिपणीस पात्र राहुन माहाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितात.

३. माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांना कायदा नियम व संस्थेचे पोट नियमानुसार आवश्यक असणारी हिशोब पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहे.

४. सन २०२५-२६ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग (अ)देण्यात आला आहे.

**ठिकाण : जालना**
**दिनांक : / /२०२६**

**आपला विश्वासु**

श्री.केशव अर्दड एस.पी.के.एअसोसिएट
छत्रपती संभजीनगर

# स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या जालना

## ताळेबंद पत्रक  ३१-०३-२०२६ अखेर नमुना 'न'

| २०२४-२५ | भांडवल व देयता | २०२५-२६ |
|---|---|---|
| | | |
| | **अधिकृत भाग भांडवल** | |
| **१०,००,००,०००.००** | अधिकृत भाग भांडवल | **१०,००,००,०००.००** |
| | **वसुल भाग भांडवल** | |
| २,७१,१६,९४१.०० | वसुल भाग भांडवल | २,८५,४६,३४१.०० |
| ०.०० | कर्ज निगडीत भाग भांडवल | ०.०० |
| २,२८,८०,९५३.०० | भाग भांडवलासाठीच्या ठेवी | २,३२,६१,७६०.०० |
| **४,९९,९७,८९४.००** | **विभाग बेरीज** | **५,१८,०८,१०१.००** |
| | **राखीव व इतर निधी** | |
| ७५,३५,०२१.८१ | राखीव निधी | ८७,१७,५२१.८१ |
| १,०६,७२,४०५.५० | इमारत निधी | १,१९,९३,७३२.५० |
| २,७७,७५०.०० | धर्मादाय निधी | २,२७,७५०.०० |
| ४,४५,८९५.१६ | गंगाजळी | ४,६७,८८७.५८ |
| १,२२,५०,०००.०० | संशयित व बुडीत निधी | १,४९,५०,०००.०० |
| ४,८५,४२३.०० | कर्मचारी कल्याण निधी | ४,८५,४२३.०० |
| १,००,७१४.०० | लाभांश देणे | १,२४,२२२.०० |
| ८६,७७०.०० | लाभांश निधी | ४८,७५१.०० |
| १,७७,८४६.०० | निवणूक खर्च तरतूद | २,०२,८४६.०० |
| ५,६६,५१६.०० | सभासद कल्याण निधी | ५,६६,५१६.०० |
| **३,२५,९८,३४१.४७** | **विभाग बेरीज** | **३,७७,८४,६४९.८९** |
| | **ठेवी** | |
| २,१४,६७,५८२.३३ | चालु खाते | १,०२,७४,५८२.२८ |
| ८,०७,४४,००९.२८ | बचत खाते | ९,९८,७३,४१३.६६ |
| २,७८,९८,१५१.८० | अल्पबचत खाते | ३,९१,३५,६५९.८० |
| ६,१६,९७,४४५.०० | अल्पमुदत ठेव | ७,६८,५३,३२४.०० |
| १,९२,५१,७९५.०० | आवर्ती ठेव | २,११,४६,४२३.०० |
| ११,७५,४३,८३४.०० | मासिक व्याज ठेव | १३,०५,३३,३३६.०० |
| २४,०७,५९,९२१.०० | स्वामी परमहंस योजना | २९,०८,०८,३४४.०० |
| ८,६६,९७३.०० | संचालक सदस्य ठेव | ९,६७,३३०.०० |
| ३,७१,७९,५२६.०० | संस्था वर्धापन दिन ठेव | ३,४०,८३,५०१.०० |
| ३४,२३,५०३.८० | अल्प बचत प्रतिनीधी सुरक्षा ठेव | ४५,२७,७६८.०० |
| ३६,०९,७४९.०० | सुरक्षा कक्ष जमा ठेव | ४०,२८,८२१.०० |
| ५,५३,३१,२५०.०० | स्वामी विवेकानंद जयंती ठेव | ८,६३,१६,७१५.०० |
| १९,९८,४४१.०० | भगिनी निवेदिता ठेव योजना | ४४,६५,०४८.०० |
| ४,४५,६६,१८०.०० | द्विदशकपूर्ती ठेव योजना | ३,५२,८६,०६२.०० |
| ४,९६,८५४.५० | मुदत संपलेले ठेवी | ०.०० |
| **७१,६८,३५,२१५.७१** | **एकूण ठेवी** | **८३,८३,००,३२७.७४** |
| ४,५९,६००.०० | इतर देयता | ९,२०,२००.०० |
| ०.०० | थकित व्याज तरतूद | १,५१,१२,७६९.३६ |
| ०.०० | देणे व्याज तरतूद | ४५,००,०००.०० |
| ४,५०,०००.०० | इतर तरतुद | ७,७५,०००.०० |
| ६,२७५.०० | सुरक्षा कक्ष भाडे तरतुद | १२,३००.०० |
| **९,१५,८७५.००** | **विभाग बेरीज** | **२,१३,२०,२६९.३६** |
| २९,२६,४५,८४५.९८ | शाखा ताळमेळ | ३४,५२,७४,८१२.२१ |
| **२९,२६,४५,८४५.९८** | **विभाग बेरीज** | **३४,५२,७४,८१२.२१** |
| | | |

| २०२४-२५ | जिंदगी व मालमत्ता | २०२५-२६ |
|---|---|---|
| | | |
| | **रोख शिल्लक** | |
| १७,२९,६६६.०० | रोख शिल्लक | २७,१६,१९८.०० |
| **१७,२९,६६६.००** | **विभाग बेरीज** | **२७,१६,१९८.००** |
| | **बँकेमधील शिल्लक** | |
| ४,७८,१४७.९८ | पंजाब नॅशनल बँक | १६,९४,०९६.८२ |
| ६२,१३,५७५.९९ | जालना जि.म.स.बॅक लि. जालना | ५१,९३,६०५.९९ |
| १,३३,१२,३१४.११ | आय सी आय सी आय बँक | १,२२,१६,६८८.८२ |
| ० | जना स्मॉल फायन्यास बॅक | ४९५५५०.१ |
| ३८,२६,७२२.०५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ३२,७०,६११.६५ |
| ६४,१३,३९९.९० | जनता सह बँक लि.पुणे | ६२,२१,८८८.३८ |
| ५,६१,८४९.०० | जळगाव जनता बँक लि.जळगाव | १,३४,३४६.३५ |
| ४५,२२,९३०.०४ | एयु स्मॉल फायन्यास बॅक | ३०,४७,१६३.०७ |
| ५५,३७,९४२.२१ | सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप | ४८,२१,१११.७१ |
| ७४,४५,०००.०० | पूर्णवादी नागरी सह.बँक | ६१,०४,५६५.६९ |
| ०.०० | आर बी एल बँक | ४८,८६८.१६ |
| **४,८३,११,८८१.२८** | **विभाग बेरीज** | **४,३२,४८,४९६.७४** |
| | **गुंतवणूक** | |
| ३२,०००.०० | राज्य फेडरेशन भाग रक्कम | ३२,०००.०० |
| ०.०० | आवर्ती ठेव / इतर | ३०,०००.०० |
| ७८,९५,२५५.०० | राखीव निधी | ९०,६७,३८४.०० |
| २७,४१७.०० | इमारत निधी | १०,२८,२०२.०० |
| ८,८०,४२,२४१.०० | सहकारी बँकांकडील ठेवी | १०,०२,१६,९५४.०० |
| ९,५५,४३,००९.९२ | शेडयुल्ड बँकांकडील ठेवी | ११,७२,१८,१९९.६१ |
| **१९,१५,३९,९२२.९२** | **विभाग बेरीज** | **२२,७५,९२,७३९.६१** |
| | **कर्जबाकी** | |
| १,६५,४२,४९०.५३ | सभासद कर्ज | १,३८,५८,३०२.६७ |
| ५३,९१,२७४.०० | वाहन कर्ज | १,२०,३९,२६०.०० |
| ३८,३०,५५४.०० | एलआयसी पॉलीसी तारण कर्ज | ६५,३६,०५८.०० |
| ३,३२,३४,१८६.८७ | कॅश क्रेडीट कर्ज | ३,२१,०७,१४२.०७ |
| २६,६२,७६१.०८ | किरकोळ व्यवसायासाठीचे कर्ज | ११,४३,०३९.०८ |
| ११,७०,८७,३६६.८० | ठेवतारण कर्ज | १५,०४,४०,५८७.८० |
| १३,०२,७१६.५८ | स्वयंव्यवसायिकांना दिलेले कर्ज | ५,९४,५८२.५८ |
| १३,७३,७५,१६७.७१ | मालमत्ता तारण कर्ज | १४,७२,४१,३७१.३३ |
| ९,२४,७७,५१२.०० | सोने तारण कर्ज | १६,८९,२२,४६२.०० |
| १३,२१,७६५.०० | शैक्षणीक कर्ज | ८,११,०८९.०० |
| २,३७,९१९.०० | शेतीविषयक कर्ज | १,२०,०००.०० |
| २,७९,०५,७३३.८४ | क्लीन लोन | २,२९,८९,५४८.९६ |
| २,२८,१५,०१६.०० | वेअर हाऊसच्या पावतीवरील कर्ज | ५३,१३,९४२.०० |
| ८०,५३,०६४.०० | गृहनिर्माण कर्ज | १,२४,९९,०००.०० |
| ६३,१३,७१९.०० | बचतगट कर्ज | ४४,५०,३६५.०० |
| **४७,६५,५१,२४६.४१** | **विभाग बेरीज** | **५७,९०,६६,७५०.४९** |
| | **स्थिर मालमत्ता** | |
| १,६१,३३,८३२.०० | सहान जागा इमारत | १,६१,३३,८३२.०० |
| ५८,८९,७६२.०० | संस्था इमारत | ७२,८१,५१६.५० |
| २१,०८,२६८.०० | तिजोरी व लॉकर्स | १७,९२,०२८.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **२,४१,३१,८६२.००** | **विभाग बेरीज** | **२,५२,०७,३७६.५०** |
| | | | | **इतर मालमत्ता** | |
| | | | १४,१०,२९६.०० | संगणक व इतर मशिनरी | ८,४९,५२९.०० |
| | | | २,५५,०९,८२६.०० | फर्निचर | २,२९,५८,८४३.०० |
| | | | २५,२३,०५६.०० | प्रिंटर व इतर मशिनरी | २४,०९,३०३.०० |
| | | | २,१४,१८४.०० | डिजीटल नेम बोर्ड | १,८२,०५६.०० |
| | | | ४,२८,२७६.०० | सुरक्षा प्रणाली | ३,६४,०३५.०० |
| | | | १,५३,३३९.०० | सौर उर्जा | १,३०,३३८.०० |
| | | | ४,३०,०३४.०० | कॅम्प्युटर सॉफ्टवेअर | ३,७६,०२०.०० |
| | | | १,८८,६१९.०० | एअर कंडीशनर | १,६०,३२६.०० |
| | | | ३७,३९२.०० | स्कुटी (EV) २ चाकी | ४७,०८३.०० |
| | | | **३,०८,९५,०२२.००** | **विभाग बेरीज** | **२,७४,७७,५३३.००** |
| | | | | **इतर येणे** | |
| | | | ६,२७५.०० | लॉकर भाडे येणे | १२,३००.०० |
| | | | २,४८,३९१.५२ | शिल्लक स्टेशनरी | ३,४५,९०२.२३ |
| | | | ८,५५,५७५.०० | सुरक्षा रक्कम (VARIOUS AGENC | ८,५५,५७५.०० |
| | | | १,०४,०९०.०० | येणे रक्कम (ADVANCE PAYMENT) | ४,४१,५२१.०० |
| | | | १,४३,६४८.०० | आय सी आय सी आय कार्ड फी | ०.०० |
| | | | ३,१७,८९०.०० | स्टाफ ॲडव्हांस | ३,११,०६०.०० |
| | | | १९,६६,२२६.५९ | आगाऊ आयकर (TDS) | १७,५२,४५१.५९ |
| | | | २८,७१२.४० | सर्वत्र मिनी एटीएम | ५०,७१२.४० |
| | | | ११,९४०.०० | लायब्ररी पुस्तके व नियतकालीके | ११,९४०.०० |
| | | | २५,७५,९४६.०० | प्राथमिक खर्च (Pre-operation) | २२,६८,३५०.०० |
| | | | २२,५१,३५६.०० | बांधकाम खर्च | २६,७८,४३१.०० |
| | | | १४,५१,०००.०० | गैर (नॉन) बँकिंग मालमत्ता | १४,५१,०००.०० |
| | | | ०.०० | पेमिंट फिनटेक प्रा.लि. | १,९२,०४०.०० |
| | | | ०.०० | पेमिंट फिनटेक प्रा.लि. | ९८६.०० |
| | | | ३,९८,२५०.०० | प्रिपेड एस एम एस (SMS) | १,८४,०८०.०० |
| | | | **१,०३,५९,३००.५१** | **विभाग बेरीज** | **१,०५,५६,३४९.२२** |
| | | | | **तरतूद** | |
| | | | २,१५,५७,८०८.४८ | गुंतवणूकीवरील येणे व्याज | २,४८,१६,१२४.०८ |
| | | | **२,१५,५७,८०८.४८** | **विभाग बेरीज** | **२,४८,१६,१२४.०८** |
| | | | २९,२६,४५,९५४.९८ | शाखा ताळमेळ | ३४,५२,७४,९२१.२१ |
| | | | **२९,२६,४५,९५४.९८** | **विभाग बेरीज** | **३४,५२,७४,९२१.२१** |
| | | | | **थकीत येणे व्याज खाते** | |
| | | | **०.००** | सभासद कर्ज | ३३,८७,८६०.८० |
| | | | **०.००** | वाहन कर्ज | ७५,९६६.०० |
| | | | **०.००** | मालमत्ता तारण कर्ज | २८,२४,२२९.०० |
| | | | **०.००** | क्लीन लोन | ४७,०५,२४८.५६ |
| | | | **०.००** | शेतीविषयक कर्ज | १,४२,५४७.०० |
| | ' | | **०.००** | एल आय सी पॉलीसी तारण कर्ज | ९७,४३८.०० |
| | | | **०.००** | किरकोळ व्यवसायासाठीचे कर्ज | १४,१९,४६१.०० |
| | | | **०.००** | स्वयं व्यवसायीकांना दिलेले कर्ज | ७,३५,९३९.०० |
| | | | **०.००** | शैक्षणीक कर्ज | ६,२०,९६९.०० |
| | | | **०.००** | बचतगट कर्ज | ११,०३,१११.०० |
| | | | | **विभाग बेरीज** | **१,५१,१२,७६९.३६** |
| | | | | | |
| **४७,२९,४९२.४२** | **निव्वळ नफा** | **६५,८१,०९८.०१** | | | |
| **१,०९,७७,२२,६६४.५८** | **एकत्रित बेरीज** | **१,३०,१०,६९,२५८.२१** | **१,०९,७७,२२,६६४.५८** | **एकत्रित बेरीज** | **१,३०,१०,६९,२५८.२१** |

# स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या.जालना

## नफा तोटा पत्रक २०२५-२६ करिता 'नमूना 'न'

| २०२४-२५ | खर्च तपशील | २०२५-२६ | २०२४-२५ | उत्पन्न तपशील | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| | **विवीध ठेवींवर दिलेले व्याज** | | | **विविध कर्जावर मिळालेले व्याज** | |
| २५,४९७.०० | चालू खाते | ३६,५१२.०० | ५६,८८,४६३.७५ | सभासदकर्ज | २६,४३,६२७.२० |
| २२,७३,९२७.०० | बचत खाते | २२,४१,८७५.०० | ७,२६,९४२.५९ | वाहन कर्ज | ११,९२,९०४.०० |
| १०,८३,१४७.०० | आवर्ती खाते | १०,९०,१४६.०० | ९,४२,२०३.०० | एलआयसी पॉलीसी तारणकर्ज | ५,९६,४३४.०० |
| ५६,३२,००३.०० | अल्पमुदत ठेवी | ४७,३३,३१३.०० | ४४,३८,८५३.०० | कॅश क्रेडीट कर्ज | ४७,६७,४२४.०० |
| १,८३,८३,३३८.०० | स्वामी परमहंस योजना | १,८७,३५,९३४.०० | ५९,४२,५२८.०० | क्लीन लोन | ४५,६०,५०८.४४ |
| १,१३,०८,६५१.०० | मासिक व्याज ठेव | १,१४,५५,७४८.०० | १२,७६,६३८.४२ | किरकोळ व्यवसायासाठीचे कर्ज | ६,०३,२६६.०० |
| ३,१२,२२३.०० | सुरक्षा जमाकक्ष ठेव लॉकर्स | ३,७२,८३५.०० | ३३,११७.०० | संगणक / मशिनरीकर्ज | - |
| ३१,७२,७०७.०० | संस्था वर्धापनदिन ठेव योजना | ३१,७२,४९९.०० | ७६,४६,५३१.०० | ठेवतारण कर्ज | १,१९,९७,११६.०० |
| २,२४,५३४.०० | अल्पबचत प्रतीनिधी सुरक्षा ठेव | २,९५,८०६.०० | १,५५,१७,४७६.०० | सोने तारण कर्ज | १,९३,५३,१३५.०० |
| १४,८६,१६५.०० | भाग भांडवल ठेव नवीन | १४,४९,८२८.०० | - | शैक्षणिक कर्ज | ५,१२,८०४.०० |
| ११,८९,३४०.०० | भगिनी निवेदिता ठेव | १३,७९,७९०.०० | ३५,९९७.०० | शेतीविषयक कर्ज | - |
| २३,८१,९५३.०० | स्वामी विवेकानंद जयंती ठेव | २५,७३,०१८.०० | ९०,४१७.०० | घर दुरुस्ती कर्ज | - |
| | | १,००,३५७.०० | ६,४२,२४८.९९ | स्वयंव्यवसायिकांना दिलेले कर्ज | २,६४,०६१.०० |
| ९५,८७२.०० | द्विदशकपूर्ती ठेव | ६,२६,२३०.०० | २,०२,९१,१६२.०० | मालमत्ता तारण कर्ज | २,०९,८४,६८५.०० |
| **४,७५,६९,३५७.००** | **विभाग बेरीज** | **४,८२,६३,८९१.००** | १३,६५,४२६.०० | बचत गट कर्ज | १,९५,०९१.०० |
| | **आस्थापना खर्च** | | २४,२६,२९४.२८ | कर्जावरील दंड व्याज | २५,०२,७६१.०० |
| ४५,५२,९३३.०० | पगार व भत्ते | ४४,९४,२६६.०० | १८,०४,४१९.०० | गृहनिमार्ण कर्ज | ११,६६,२२४.०० |
| ४०,०३,८६२.०० | रोजंदारी कर्मचारी भत्ता | ३८,२८,८७५.०० | ४१,९७,०४१.०० | वेअर हाऊसच्या पावती वरील कर्ज | ३२,०४,९०६.०० |
| ३,९८,२५८.०० | कर्मचारी बोनस | ६,५१,५४३.०० | **७,३०,६५,७५८.०३** | **विभाग बेरीज** | **७,४५,४४,९४६.६४** |
| १२,९६,२७०.०० | अस्थायी कर्मचारी पगार | १३,०५,५४३.०० | १,५७,६४,७४१.६३ | गुंतवणुकीवर मिळालेले व्याज | १,६९,७७,४७७.६९ |
| ३८,३३५.०० | कर्मचारी कल्याण खर्च | ७४,५८२.०० | **१,५७,६४,७४१.६३** | **विभाग बेरीज** | **१,६९,७७,४७७.६९** |
| ३,२८,६२०.०० | प्रशिक्षण व सेमीनार | ३,०९,१५५.०० | | **इतर उत्पन्न** | |
| ७,९०,५६८.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह योगदान | ८,७३,९७६.०० | १,६०,०६१.७० | प्रवेश फी | २,१२,०१६.४० |
| ४,९६,६५०.०० | स्टाफ इन्सेटिव्ह | ५,२९,४२०.०० | ९७,३२१.८४ | किरकोळ जमा | ८३,५४१.१० |
| - | राज्य विमा कार्पोरेशन | ३०,६४१.०० | ३,६९,३९६.९३ | कमिशन | ४९,४७०.९८ |
| **१,१९,०५,४९६.००** | **विभाग बेरीज** | **१,२०,९८,००१.००** | १८,३०,४२९.२७ | सर्व्हिस चार्जेस | २०,३१,०८६.०८ |
| | **व्यवस्थापन खर्च** | | १४,२३,४४३.०० | कर्ज छाननी फी | २४,५७,५७९.०० |
| ३,८०,१९७.०० | स्थानिक प्रवास | १,९२,५४९.०० | १,२१,७७७.०० | सुरक्षा जमा कक्ष भाडे | १,१६,५२६.०० |
| १,२५,४८१.०० | प्रवास खर्च | ९७,८४७.०० | २४,४५०.०० | कर्ज मागणी अर्ज फी | २३,३८५.०० |
| ३,८६,३५८.४० | दुरध्वनी बील | ३,७६,६७२.१८ | **४०,२६,८७९.७४** | **विभाग बेरीज** | **४९,७३,६०४.५६** |
| ४,८२,५७८.०० | वीज बील | ५,८८,३७६.०० | | | |
| ९,७८,४६१.०० | सुरक्षा एजन्सी खर्च | ७,८७,५८५.०० | | | |
| ५,३५,०२६.०० | किरकोळ खर्च | ६,२५,६८८.९२ | | | |
| ३७,८४,०४३.०० | अल्पबचत प्रतीनिधी कमिशन | ४१,३६,१४८.०० | | | |
| २,७०,०५२.४८ | छपाई व स्टेशनरी | ३,२२,०२८.२९ | | | |
| ८,८९,१७१.०० | वसुलीसाठी झालेला खर्च | १०,७७,१८४.०० | | | |
| ४९,७१०.०० | जिल्हा फेडरेशन वार्षिक वर्गणी/क्रास | २१,२५०.०० | | | |
| २,९०,८४०.०० | लेखापरीक्षण फी | २,७३,८००.०० | | | |
| ६,९७०.०० | लेखापरीक्षण खर्च | ५,७२०.०० | | | |
| २,५१,०३०.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २,५७,२०५.०० | | | |
| १,२४,५१८.०० | सामाजिक उपक्रम | १,११,५९४.०० | | | |
| - | डिपॉझीट कमिशन | - | | | |
| ३,३१,८९८.६४ | वार्षिक देखभाल दुरुस्ती | ३,८२,४३२.०० | | | |
| - | व्यवसाय कर | ५,०००.०० | | | |
| २,५९,६४५.०० | किरकोळ दुरुस्ती | १,३०,०७३.०० | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५,१४,२६३.०० | चहापान खर्च | ५,५१,८९९.०० | | | |
| ३०,७१,३२२.०० | भाडे  कर व उपकर | ३२,९४,८९०.८० | | | |
| ७,६३,७०२.०० | विमा हप्ता | ५,८७,१५९.२४ | | | |
| १,०२,८६२.०० | टपाल खर्च | ५२,९५७.०० | | | |
| १५,६७,६७२.३७ | कर्जाखातेवर दिलेली सुट | ९,८४,८३८.४४ | | | |
| ७,४०,१५६.६७ | कर्ज खातेवरील दिलेले व्याज | ६,६८,०८५.०१ | | | |
| १,२८,५०५.०० | पाण्यासाठी झालेला खर्च | १,२४,२१०.०० | | | |
| ३,६६,९५०.०० | जाहीरात खर्च | ५,९७,४३१.०० | | | |
| **१,६४,०१,४१२.५६** | **विभाग बेरीज** | **१,६२,५२,६२२.८८** | | | |
| | **इतर खर्च** | | | | |
| २,११,२६२.४२ | बँक चार्जेस | १,३५,९६०.०० | | | |
| २,८६,२१७.०० | प्री ऑपरेटीव एक्सपेंनसेस | २,५७,५९६.०० | | | |
| ९,४४,०००.०० | कन्सेलटेशन फी | ७,०३,०००.०० | | | |
| ५२,५०,०००.०० | बुडीत व संशयीत तरतूद | ७२,००,०००.०० | | | |
| | १६९तरतूद | १,०३,८००.०० | | | |
| **६६,९१,४७९.४२** | **विभाग बेरीज** | **८४,००,३५६.००** | | | |
| **८,२५,६७,७४४.९८** | **एकूण खर्च** | **८,५०,१४,८७०.८८** | | | |
| १,०२,८९,६३४.४२ | ढोबळ नफा | १,१४,८१,१५८.०१ | | | |
| ५५,६०,१४२.०० | घसारा | ४९,००,०६०.०० | | | |
| ४७,२९,४९२.४२ | **निव्वळ नफा** | ६५,८१,०९८.०१ | | | |
| **९,२८,५७,३७९.४०** | **एकत्रित बेरीज** | **९,६४,९६,०२८.८९** | **९,२८,५७,३७९.४०** | **एकत्रित बेरीज** | **९,६४,९६,०२८.८९** |

## अंदाजपत्रकापेक्षा कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाचे पत्रक २०२५-२०२६

| तपशील | २०२५-२६ | प्रत्यक्ष खर्च | फरक |
|---|---|---|---|
| **विविध ठेवीवरील देय व्याज** | | | |
| ठेवीवरील दिलेले व्याज | ४७२३१४५० | ४८२६३८९१ | १०३२४४१ |
| **विभाग बेरीज** | **४७२३१४५०** | **४८२६३८९१** | **१०३२४४१** |
| **आस्थापना खर्च** | | | |
| पगार व भत्ते | ५७५०००० | ४४९४२६६ | -१२५५७३४ |
| रोजंदारी कर्मचारी भत्ता | ५१७५००० | ३८२८८७५ | -१३४६१२५ |
| बोनस व इतर | ४८३००० | ६५१५४३ | १६८५४३ |
| करारनामा कर्मचारी पगार | ११५०००० | १३०५५४३ | १५५५४३ |
| कर्मचारी  कल्याण खर्च | ४६०००० | ७४५८२ | -३८५४१८ |
| प्रशिक्षण व सेमीनार | २८७५०० | ३०९१५५ | २१६५५ |
| कर्मचारी भविष्य निर्वाह योगदान | ६३२५०० | ८७३९७६ | २४१४७६ |
| स्टाफ इन्सेटिव्ह | ५७५००० | ५२९४२० | -४५५८० |
| ESIC | ० | ३०६४१ | ३०६४१ |
| **विभाग बेरीज** | **१४५१३०००** | **१२०९८००१** | **-२४१४९९९** |
| **व्यवस्थापन खर्च** | | | ० |
| स्थानिक  प्रवास | ५७५००० | १९२५४९ | -३८२४५१ |
| प्रवास  खर्च | २३०००० | ९७८४७ | -१३२१५३ |
| दुरध्वनी बील | ५७५००० | ३७६६७२.१८ | -१९८३२७.८२ |
| वीज बील | ७७०५०० | ५८८३७६ | -१८२१२४ |
| सुरक्षा एजन्सी खर्च | १०३५००० | ७८७५८५ | -२४७४१५ |
| किरकोळ खर्च | ६३२५०० | ६२५६८८.९२ | -६८११.०८ |
| अल्पबचत प्रतीनिधी कमिशन | ४८३०००० | ४१३६१४८ | -६९३८५२ |
| छपाई व स्टेशनरी | ६९०००० | ३२२०२८.२९ | -३६७९७१.७१ |
| वसुलीसाठी झालेला खर्च | ७०५००० | १०७७१८४ | ३७२१८४ |
| जिल्हा फेडरेशन  वार्षिक वर्गणी/क्रास | ५१७५० | २१२५० | -३०५०० |
| लेखापरीक्षण फी | ४३७००० | २७३८०० | -१६३२०० |
| लेखापरीक्षण खर्च | ८०५० | ५७२० | -२३३० |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १६१००० | २५७२०५ | ९६२०५ |
| सामाजिक उपक्रम | १९५५०० | १११५९४ | -८३९०६ |
| डिपॉझीट कमिशन | ३०५००० | ० | -३०५००० |
| वार्षिक देखभाल दुरुस्ती | ४०२५०० | ३८२४३२ | -२००६८ |
| व्यवसाय  कर | ३४५० | ५००० | १५५० |
| किरकोळ दुरुस्ती | ६९०००० | १३००७३ | -५५९९२७ |
| चहापान खर्च | ६९०००० | ५५१८९९ | -१३८१०१ |
| भाडे  कर व उपकर | ३३३५००० | ३२९४८९०.८ | -४०१०९.२ |
| विमा हप्ता | ९२०००० | ५८७१५९.२४ | -३३२८४०.७६ |
| टपाल खर्च | १७२५०० | ५२९५७ | -११९५४३ |

| | | | |
|---|---|---|---|
| न्यायलयीन फी व कायदेशीर फी | ११५०० | ० | -११५०० |
| कर्जाखातेवर दिलेली सुट | १०००००० | ९८४८३८.४४ | -१५१६१.५६ |
| कर्ज खातेवरील दिलेले व्याज | ११५०००० | ६६८०८५.०१ | -४८१९१४.९९ |
| पाण्यासाठी झालेला खर्च | १४९५०० | १२४२१० | -२५२९० |
| जाहीरात खर्च | ५७५००० | ५९७४३१ | २२४३१ |
| **विभाग बेरीज** | **२०३००७५०** | **१६२५२६२२.८८** | **-४०४८१२७.१२** |
| **इतर खर्च** | | | ० |
| बँक चार्जेस | १६१००० | १३५९६० | -२५०४० |
| प्री ऑपरेटीव एक्सपेंनसेस | ३४५००० | २५७५९६ | -८७४०४ |
| कन्सेलटेशन फी | ९७७५०० | ७०३००० | -२७४५०० |
| बुडीत व संशयीत तरतूद | ३०००००० | ७२००००० | ४२००००० |
| घसारा | ५५००००० | ४९०००६० | -५९९९४० |
| कर्जावरील येणे व्याज तरतूद | ० | १०३८०० | १०३८०० |
| **विभाग बेरीज** | **९९८३५००** | **१३३००४१६** | **३३१६९१६** |
| **एकूण खर्च** | ९२०२८७०० | ८९९१४९३०.९ | -२११३७६९.१२ |
| **निव्वळ नफा** | ७१०८२५० | ६५८१०९८.०१ | -५२७१५१.९९ |
| **एकत्रित बेरीज** | **९९१३६९५०.००** | **९६४९६०२८.८९** | **-२६४०९२१.११** |

# उत्पन्न व खर्च अंदाजपत्रक २०२६-२७ साठी

| खर्च तपशील | रक्कम रु. | उत्पन्न तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| **विवीध ठेवींवर दिलेले व्याज** | | **विविध कर्जावर मिळालेले व्याज** | |
| **विभाग बेरीज** | **५,७९,१६,६६९.००** | **विभाग बेरीज** | ८९४५३९३५ |
| **आस्थापना खर्च** | | गुंतवणुकीवर मिळालेले व्याज | २०३७२९७३ |
| पगार व भत्ते | ५३,५०,०००.०० | **विभाग बेरीज** | २०३७२९७३ |
| रोजंदारी कर्मचारी भत्ता | ४६,००,०००.०० | **इतर उत्पन्न** | |
| बोनस व इतर | ७,८०,०००.०० | **विभाग बेरीज** | ५९६८३२५ |
| करारनामा कर्मचारी पगार | १५,७०,०००.०० | | |
| कर्मचारी  कल्याण खर्च | १,३०,०००.०० | | |
| प्रशिक्षण व सेमीनार | ३,८०,०००.०० | | |
| कर्मचारी भविष्य निर्वाह योगदान | १०,८०,०००.०० | | |
| स्टाफ इन्सेंटिव्ह | ७,००,०००.०० | | |
| ESIC | ७०,०००.०० | | |
| **विभाग बेरीज** | **१,४६,६०,०००.००** | | |
| **व्यवस्थापन खर्च** | | | |
| स्थानिक  प्रवास | २,५०,०००.०० | | |
| प्रवास  खर्च | १,२५,०००.०० | | |
| दुरध्वनी बील | ४,५०,०००.०० | | |
| वीज बील | ७,१०,०००.०० | | |
| सुरक्षा एजन्सी खर्च | ९,५०,०००.०० | | |
| किरकोळ खर्च | ७,५०,०००.०० | | |
| अल्पबचत प्रतीनिधी कमिशन | ४९,७०,०००.०० | | |
| छपाई व स्टेशनरी | ३,९०,०००.०० | | |
| वसुलीसाठी झालेला खर्च | १३,००,०००.०० | | |
| जिल्हा फेडरेशन  वार्षिक वर्गणी/क्रास | २५,५००.०० | | |
| लेखापरीक्षण फी | ३,५०,०००.०० | | |
| लेखापरीक्षण खर्च | ७,०००.०० | | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २,५०,०००.०० | | |
| सामाजिक उपक्रम | १,४०,०००.०० | | |
| वार्षिक देखभाल दुरुस्ती | ४,६०,०००.०० | | |
| व्यवसाय  कर | २,५००.०० | | |
| किरकोळ दुरुस्ती | १,६०,०००.०० | | |
| चहापान खर्च | ६,७०,०००.०० | | |
| भाडे  कर व उपकर | ३९,५३,०००.०० | | |
| विमा हप्ता | ७,०५,०००.०० | | |
| टपाल खर्च | ७०,०००.०० | | |
| कर्जाखातेवर दिलेली सुट | १०,००,०००.०० | | |
| कर्ज खातेवरील दिलेले व्याज | ९,००,०००.०० | | |
| पाण्यासाठी झालेला खर्च | १,४०,०००.०० | | |
| जाहीरात खर्च | ७५,००,०००.०० | | |
| **विभाग बेरीज** | **२,६२,२८,०००.००** | | |
| **इतर खर्च** | | | |
| बँक चार्जेस | १,६५,०००.०० | | |
| प्री ऑपरेटीव एक्सपेंनसेस | ३,१०,०००.०० | | |
| कन्सेलटेशन फी | ८,५०,०००.०० | | |
| बुडीत व संशयीत तरतूद | ३०,००,०००.०० | | |
| **विभाग बेरीज** | **४३,२५,०००.००** | | |
| **एकूण खर्च** | **१०,३१,२९,६६९.००** | | |
| ढोबळ नफा | १,२६,६५,५६४.०० | | |
| घसारा | ४५,००,०००.०० | | |
| **निव्वळ नफा** | ८१,६५,५६४.०० | | |
| **एकत्रित बेरीज** | **११,५७,९५,२३३.००** | **एकत्रित बेरीज** | **११५७९५२३३** |